F0 (26)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** चिकलठाणा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0392 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/08/2024 04:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 01/08/2024
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/08/2024
**Time From (वेळेपासून):** 19:36 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:36 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/08/2024 **Time (वेळ):** 03:46 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/08/2024 03:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 12 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पिसादेवी ते सावंगी बायपास ,जाणारे रोडवर शेख नईम यांचे, पानटपरीवर पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** तुळशीराम गोपीनाथ पाडळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पिसादेवी,छत्रपती संभाजीनगर,चिकलठाणा ,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पिसादेवी,छत्रपती संभाजीनगर,चिकलठाणा ,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850129410

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवाजी रतन परडे | | | 1. पिसादेवी,छत्रपती संभाजीनगर , चिकलठाणा ,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी रोख रक्कम | 4,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):
4,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी बाळु ऊर्फ तुळशीराम गोपीनाथ पाडळे, वय 45 वर्ष, व्यवसाय शेती/दुध उत्पादन, रा.पिसादेवी ता.जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9850129410

मी वरील प्रमाणे असुन दिनांक 29/07/2024 रोजी समक्ष अँन्टी करप्शन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे समक्ष हजर येऊन पोलीस निरीक्षक श्री. दिंडे व दोन पंचासमक्ष माझ्याकडे होत असलेल्या पैशाचे मागणीची तक्रार दिली की, मी मागील तीन महिन्यापुर्वी गायगोठा मिळणे करीता आमचे गावचे ग्रामपंचात मध्ये माझे आधारकार्ड, बॅक पासबुक ची झेरॉक्स दिली होती. त्यानंतर मी ग्रामपंचायतकडे माझ्या गाय गोठयाची विचारणा करायला गेलो नाही. परंतू आमचे गावातील शिवाजी रतन पखे यांनी दिनांक 28/07/2024 रोजी दुपारी 12 वाजेच्या सुमारास मला माझे फोनवर फोन केला व बोलले की, तुम्ही मला तुमचे म्हशीचे व सध्या म्हशी बांधत असलेल्या जागेचे फोटो व्हॉटसअप वर मला पाठवा. त्यावेळी मी त्यांना बोललो की, कशासाठी त्यावेळी शिवाजी पखे यांनी मला बोलले की, तुम्हाला शासनाचा गायगोठा मंजुर करण्याचे प्रोसीजरला लागणार आहेत. मी उदया पंचायत समितीला जाणार आहे. तुमचा गायगोठा मंजुर करायचा असल तर 5,000/- रुपये बीडीओ मॅडम यांना दयावे लागतात त्यासाठी 5,000/- रुपये माझ्याकडे दोन दिवसात दया, नाहीतर इलेक्शनचा पिरीयड हाय जर पैसे दिले नाही तर तुमचा गायगोठा मंजुर होणार नाही असे सांगितले. त्यावेळी शिवाजी पखे यांना कांहीतरी कमी करा असे बोललो परंतू त्यांनी 5,000/- रुपयांत कांहीच कमी होणार नाही, नाहीतर गायगोठयाचे काम होणार नाही असे ठणकावुन सांगितले. त्यावेळी मी शिवाजी पखे यांना ठिक आहे करतो काही तरी असे नाईलाजास्तव बोललो. व त्यानंतर शिवाजी पखे यांचा मो.नं. 9518344093 या नंतरवर माझ्या म्हशीचे व म्हशी बांधत असलेल्या जागचे फोटो पाठवुन दिले.

शिवाजी रतन पखे यांना, मला शासनाकडुन मिळणारा गायगोठा मंजुर करुन आणुन देण्यासाठी 5,000/- रुपये दयायची इच्छा नाही. माझेत व शिवाजी रतन पखे यांचेत पैशाच्या देण्या घेण्याचा उसनवारीचा व्यवहार नाही. वैर दुश्मनी नाही. शिवाजी पखे यांनी मला दोन दिवसात पैसे देण्याचे सांगितले आहे. तरी दि.29/07/2024 रोजी पुढील कारवाई करावी अशी विनंती केली होती.

मी चौथी शाळा शिकली असुन मला मराठीत वाचता येते. परंतू व्यवस्थीत लिहीता येत नसल्याने कॉम्प्युटरवर तक्रार टाईप करण्यास सांगितली. मी सांगितल्याप्रमाणे तक्रार टाईप केली असुन ती तक्रार मी वाचुन पाहिली बरोबर व खरी असल्याने त्या तक्रारीवर मी, दोन्ही पंच, पो.नि.दिंडे साहेब यांनी सहया केल्या.

मी वरील प्रमाणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पो.नि.दिंडे साहेब यांनी शिवाजी रतन पखे यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय दि.29/07/2024 रोजी घेतला. त्यावेळी मी माझ्या फोनवरुन शिवाजी पखे यांना ते कुठे आहेत याबावत विचारणा केली असता शिवाजी पखे यांनी पंचायत समितीला आहे. संध्याकाळी पिसादेवी येथे भेटू असे सांगितले. त्यामुळे दि.29/07/2024 रोजी संध्याकाळी पिसादेवी चौफुली येथे मी, दोन्ही पंच, पो.नि.दिंडे साहेब व त्यांचे पथक असे हजर झाले तेथे पो.नि.दिंडे साहेब यांनी आम्हा सर्वांना लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाई बाबतची संपुर्ण प्रक्रिये बाबत माहीती देऊन, समजावुन सांगुन सुचना दिल्या त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन, व्हाईस रेकॉर्डर माझ्या अंगावर लपवुन दिला व सोबत पंच क्र.1 यांना देऊन शिवाजी रतन पखे यांचे भेटीसाठी माझ्याकडील मोटार सायकलने संध्याकाळी 07.15 वाजेच्या सुमारास पाठविले.

त्याप्रमाणे पिसादेवी चौफुलीवर टपऱ्यांवर शिवाजी पखे यांना पाहत असताना ते साईनगर, पिसादेवी येथील सावंगी बायपासकडे जाणाऱ्या रोडवरील नईम शेख यांचे पानटपरीवर शिवाजी पखे उभा होते. शिवाजी पखे यांनी मला पाहुन काय बाळु भाऊ लय परेशान हाय काय असे बोलले त्यावेळी मी शिवाजी पखे यांना नय नय परेशान काय परेशान तर होणारच हाय मी.. मंग पखे साहेब काय म्हणता बोला..अरो बोलले त्यावेळी शिवाजी पखे यांनी मला गायगोठयाचे शासनाकडुन मिळणाऱ्या पैशाबाबत व प्रक्रियेबाबत बोलले. त्यावेळी शिवाजी पखे यांना मी बोललो की, मंग माझं आल का कम्प्लीट होत.. त्यावेळी शिवाजी पखे यांनी, तुमचे फोटो-गिट किलेर केलंना.. आता फक्त त्या बीडीओ



Scanned with CamScanner

मॅडमशी बोलणं झालं.. त्या संबंधीत अधिकाऱ्याला सांगलं त्यायनं.. पिसादेवीचे प्रकरणं निकाली काढवं.. त्यायची
टक्केवारी ठरेल राहती. असे बोलले. तसेच आपलं गावातलं काम हाय.. आपल्यातलं कोणी तयार होईना ना..
जाऊन करुन घ्यायला तिथं पंचायत समितीला.. मंग इतक्या रोज आपलं बरच काम झालं असतं..असे बोलले
त्यावेळी मी बोललो की, मंग ही अमाऊंट कोण मागु राहिले हे.. बीडीओ साहेब कां..त्यावेळी शिवाजी पखे बोलले
की, बीडीओ साहेब ते तिथं अधिकारी राहते त्याच्यात.. त्यावेळी मी बोललो की, कसे कसे मागते ते..त्यावेळी
शिवाजी पखे बोलले की, ते टेबल टेबल ठरेल राहते..त्यायचे एकाकडे देऊन टाकायचे ते सगळं करुन घेते.. त्यावेळी
मी बोललोकी, चकरा माराव्याच लागताना काम करायचे तर, मी म्हणलं ग्रामपंचायत फुकटमध्ये काम हय. सरकारी
योजना हय. मला वाटल. त्यावेळी शिवाजी पखे बोलले की, नाही सरकारी योजना हाय.. पण हे पैसे फुकट हायना.
ते अधिकारी कामच नाही करीत तस. तुम्ही एखादया विचारून पाहा. त्यावेळी मी बोललो की, किती ? किती
निपटनार मग माझ ? शिवाजी पखे बोलले की, पाइना आता, जे लागन ते. पाच-पाच घ्याचे. कम जादा पडले तर
शेवट पाइ हजार पाचशे उजुन घ्याचे. पहीले पैसे भेटल्यावर. त्यावेळी मी बोललो की, पहीले पाच ठेवायचे का ?
त्यानंतर शिवाजी पखे बोलले की, हां..त्याच्यातुन उरले तर वापस देऊन टाकायचे. असे म्हणुन पाच हजार रुपये
बीडीओ मॅडमच्या नावाने लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच क्र.1 पो.नि.दिंडे साहेब यांचेकडे परत आलो.
त्यावेळी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन त्यातील माझे व शिवाजी पखे यांचेतील संभाषण पो.नि.दिंडे साहेब व
पंचांनी ऐकले त्यावेळी शिवाजी पखे यांनी बीडीओ मॅडमसाठी पाच हजार रुपये मागणी केल्याचे निष्पन्न झाले.
शिवाजी पखे यांनी बीडीओ मॅडमच्या नावाने माझ्याकडे गायगोठयासाठी 5,000/-रुपये मागितले परंतू बीडीओ
मॅडमनी शिवाजी पखे याला खरोखरच गायगोठयाचे पैसे घेण्यास सांगितले आहे किंवा नाही ही पडताळणी करणे
करीता परत माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला व सोबत पंच क्र.1 यांना देऊन शिवाजी पखे
यांची भेटीसाठी पंच क्र.1 यांना सोबत देऊन पाठविले. त्यावेळी मी शिवाजी पखे यांचे घरासमोर जाऊन शिवाजी
पखे यांची भेट घेतली. त्यावेळी मी बोललो की, समजा मी जर आलो मॅडमकडं तर शिवाजी पखे बोलला की,
मॅडमला पैसे दयाचेना त्या दिवशी तुम्ही सोबतच चला उदया दोन चार दिवसांनी..त्यावेळी मी बोललो की, मॅडम हाय
का जेन्टस हाय..तर शिवाजी पखे यांनी मॅडम हाय अधिकारी मी विचारलं काय नाव हाय शिवाजी पखे बोलला
पोटगिरे मॅडम का काहीतरी हाय.. पोटगिरे पैठणला आण ते औरंगाबाद एकच हाय त्यावेळी मी 5,000/- रुपयांत
कांही कमी करतील का अशी विनंती करा असे बोललो तर शिवाजी पखे यांनी माझ्या आमच्या हातात कईच नाही ते
राजुसेठ आणं तुम्ही सरपंच सगळेजण बोला तिला आणं मंग होईल ते असे म्हणले. त्यानंतर मी व पंच क्र.1 पो.नि.
दिंडे साहेब यांचकडे परत आलो. माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद करुन त्यातील वरील संभाषण सविस्तर
ऐकले. व त्यानंतर बीडीओ मॅडम यांनी खरोखरच शिवाजी पखे यांना माझ्याकडुन गायगोठयासाठी 5,000/-रुपये
घेण्यास सांगितले किंवा कसे याची पडताळणी करण्याचे ठरले होते.

त्याप्रमाणे दि.01/08/2024 रोजी मी ला.प्र.वि.छ.संभाजीनगर येथे हजर आलो व पुढील कारवाई करण्याचे
सांगितल्यावरुन पो.नि.दिंडे साहेब,दोन्ही पंच, व सापळा पथक असे पंचायत समिती छ.संभाजीनगर कार्यालयाचे
जवळ थांबलो तेथे पो.नि.दिंडे साहेबांनी बीडीओ मॅडमच्या लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने सुचना दिल्या
त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला व सोबत पंच क्र.
1 यांना देऊन बीडीओ मॅडम पंचायत समिती छ.संभाजीनगर येथे पायी गेलो. तेथे आमच्या पिसादेवी गावच्या
बीडीओ मॅडमची विचारपुस केली. तेथे पिसादेवी ग्रामपंचायतीच्या बीडीओ मॅडम हया श्रीमती मिना रवताळे हया
होत्या. मी व पंच क्र.1 असे बीडीओ मॅडम मिना रवताळे यांचे कार्यालयीन कक्षात गेलोत तेथे बीडीओ मॅडम हया
समक्ष हजर होत्या त्यांना बोललो मी शिवाजी पखे याने प्रत्येक गायगोठयाला पाच हजार रुपये मागितले असे बोललो
तर बीडीओ मॅडम यांनी शिवाजी पखे कोण हाय असे म्हणुन शिवाजी पखेला ओळखत नसल्याचे सांगुन त्यांचा आण
माझा कांही संबंध नसल्याचे बीडीओ मॅडम यांनी सांगितले. माझी व आमचे गावातील इतर लोकांच्या गायगोठयाच्या
फाईली आल्याचे बीडीओ मॅडम यांनी सांगितले. त्यानंतर मी पंच क्र.1 पो.नि.दिंडे साहेब यांचेकडे परत आलो.
माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर माझे व बीडीओ मॅडम यांचेतील संभाषण आम्ही सर्वांनी
ऐकले. शिवाजी पखे यांनी बीडीओ मॅडमच्या नावाने परस्पर माझ्याकडे गायगोठयासाठी 5 हजार रुपये मागितल्याचे
दिसुन आले. शिवाजी पखे याला बीडीओ मॅडमचे खरं नांव काय आहे हे सुध्दा माहीत नाही. कारण शिवाजी पखे
याने मला 5 हजार रुपये मागितले त्यावेळी बीडीओ मॅडमचे नाव पोटगिरे असे सांगितले होते. त्यानंतर मी पो.नि.दिंडे
साहेबांना सांगितले की, शिवाजी पखे याने बीडीओ मॅडमच्या नावाने परस्पर मागितले आहेत हे आता स्पष्ट झाले.
त्यामुळे आता पिसादेवी गावात चला व शिवाजी पखे याला त्याने बीडीओ मॅडमच्या नावाने मागितलेले 5 हजार रुपये
देऊन पुढील कारवाई करा. त्यावरुन पो.नि.दिंडे, दोन्ही पंच व सापळा पथक असे आम्ही पिसादेवी गावात दि.
01/08/2024 रोजी संध्याकाळी 04.00 वा.सुमारास पोहचलो. तिथे सापळा कारवाईच्या अनुषंगाने पो.नि.दिंडे



Scanned with CamScanner

साहेबांनी आम्हा सर्वांना मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. व शिवाजी पखे यांचे भेटीला जाण्यासाठी त्यांचे ठावठिकाणा घेणेसाठी मी माझ्या फोनवरुन शिवाजी पखे यांना फोन केला. त्यावेळी शिवाजी पखे याने मला घरीच असल्याचे कळवुन बोलविले. त्यावेळी पो.नि.दिंडे साहेबांकडे मी 4 हजार रुपये लाचेची रक्कम म्हणुन हजर केले. कारण माझ्याकडे 1 हजार रुपये कमी होते. त्या 4 हजार रुपयांना अँन्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटा माझ्याकडे दिल्या व पंच क्र.1 यांना माझ्या सोबत दिले. माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला. त्यानंतर मी पंच क्र.1 पायी शिवाजी पखे यांचे घरासमोर गेलो तेथे मी शिवाजी पखे यांना फोन केला तर शिवाजी पखे हे त्यांचे घरापासुन जवळच थोडया अंतरावर असलेल्या शेख नईम यांचे पानटपरीवर होते. मी त्या ठिकाणी पंच क्र.1 यांचेसह गेलो व शिवाजी पखे यांची भेट घेतली. त्यावेळी शिवाजी पखे यांनी काही आडचण नाही ना,, तेवढ तुमच्या भाच्याला फोन करतो मी आनिला,, पैशे दिले ना भो,, बाळु भाऊ ने आमच्या.असे म्हणुन अनिल काळे यांना फोन केला. व मी पैसे घेऊन आल्याचे सांगितले व माझ्याशी चर्चा करुन माझ्याकडुन 4 हजार रुपये शिवाजी पखे यांनी स्वत: घेऊन टपरीचालक नईम यांचेकडुन मोजणी करुन चार हजार रुपये असल्याची खात्री करुन परत स्वत: स्विकारले. त्याचवेळी मी पुर्व नियोजीत ठरलेला इशारा म्हणुन मी माझ्या अंगातील पॅन्टच्या डावे बाजुच्या समोरील डाव्या खिशातील रुमाल काढुन कपाळ पुसल्यासारखे केला ती वेळ संध्याकाळची 07.36 वाजेची होती.त्यावेळी पो.नि.दिंडे साहेब व त्यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी हजर येऊन शिवाजी रतन पखे यांना मी दिलेल्या लाचेच्या 4 हजार रुपये रकमेसह रंगेहाथ पकडुन ताब्यात घेतले.
तरी शिवाजी रतन पखे,रा. पिसादेवी यांनी मला शासनाच्या मिळणाऱ्या गोयगोठा योजनेतुन गायगोठा मिळवुन देतो असे म्हणुन माझ्याकडुन गोठयाचे फोन व्हॉटसअपवर माझ्याकडुन घेऊन बीडीओ मॅडमच्या नावाने माझ्याकडे दि. 29/07/2024 रोजी 5,000/- रुपये लाचेची मागणी केली. मागणी केलेली लाचेची रक्कमेपैकी 4 हजार रुपये लाचेची (सीसीटीएनएस प्रणालीमध्ये शब्द मर्यादा संपल्याने पुढील फिर्याद पुढील पानावर स्वतंत्र जोडली आहे.)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ravikiran Tukaram darwade(SI (Sub-Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

तुळशीराम पखडे
2/8/24



Scanned with CamScanner

(31)

N.C.R.B (एन.सी.आर.

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

बुक्कीराम पाळे

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Ravikiran Tukaram

**Rank(पद):** SI (Sub-Inspector)

**No.(सं.):** PI

नाव एम. के. नागरगोजे

पद व नं सफौ/996

पोलीस ठाणे

ता जि छत्रपती संभाजीनगर

Scanned with CamScanner